**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क:
9975434591



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**सेवेकरी भरती**

१) सुपरवायझर- १ । २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ । ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ । ६) स्वयंपाक बाई-१

याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १६७ वा | मंगळवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# आंधळं दळतंय, कुत्रं पीठ खातंय...!!

बकाल झालेल्या सोलापूर शहराला सौंदर्याचं रुपडं देणाऱ्या जुळे सोलापूर परिसराचा आम्हाला रहिवासी म्हणून अभिमान वाटतो. जुळे सोलापूर हे मध्यमवर्गीय शिक्षित नोकरदारांचा मोठ्याप्रमाणात रहिवास असलेले नियोजित शहर आहे. या जुळे सोलापूरच्या आरोग्याला आणि सौंदर्याला बाधा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध आवाज उठवून इथले नागरिक लगेचच अतिक्रमण हटावची भूमिका घेतात. पण मनपा प्रशासनच जर कायदा गुंडाळून बांधकाम करत असेल तर...? दाद कुणाकडे मागायची ?

जुळे सोलापुरात तुम्ही कुठं राहता ? म्हणून जर रहिवाशांना प्रश्न विचारला तर नागरिक अभिमानाने सांगतात,"पाण्याच्या टाकीजवळ". आता हा आमचा अभिमानच मोडून काढायचा पालिका प्रशासनाने ठरवलं आहे. या पाण्याच्या टाकीच्या कुशीत मनपा प्रशासनाने "सुलभ शौचालय" सुरू करण्याचा घाट घातला आहे. सुलभ शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून सुलभतेने वेळ काढून "शी" करणारा एखादा राजकीय पाहुणा मिळाला की हे सुलभ शौचालय सुरू होणार आहे. प्रशासनाचा निर्णय म्हणजे "काळ्या दगडावरची पांढरी रेष". पैसे आकारलेली हागणदारी सुरू होणार म्हणजे सुरू होणार.



तुम्ही म्हणाल, निवडून दिलेले लोकप्रतिनिधी काय झोपा काढतात का ? आमच्या "बापूंनी" स्वतःचे राहते घर "उन्हात" बांधल्याने ते स्वतः अडचणीत सापडलेत. मग ते आमची ही "अडचण" कशी सोडवणार....? बरं सुलभ शौचालय ही नागरिकांसाठीच केलेली सोय आहे, तुम्ही का कोकलता...? असा रामशास्त्रीबाणा तुम्ही आम्हाला दाखवाल, आम्ही बिचारे मध्यमवर्गीय नोकरदार गप्प बसून लोकांचा सुगंधित वास सहन करणार.

पण मुद्दा अतिसंरक्षित (अतिसंवेदनशील) जागेवर अतिक्रमण करून बांधकाम करण्याचा आहे. मनपा प्रशासनाने दिवसा ढवळ्या कायद्याला धाब्यावर बसवून केलेला हा गुन्हाच आहे.

या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही, याचा एक किस्सा आठवणीत आला म्हणून सांगतो. २००७ ते २०१२ या काळात सोलापूर महापालिकेचे विरोधी पक्षनेते असलेले आप्पासाहेब चौगुले यांनी याच पाण्याच्या टाकीभोवती छोटे व्यापारी गाळे बांधण्याचा प्रस्ताव तत्कालीन मनपा आयुक्तांना दिला होता. त्यावेळी तत्कालीन मनपा आयुक्तांनी महापालिकेचे विधी सल्लागार असलेले ज्येष्ठ विधिज्ञ विजय मराठे यांना याबाबत अभिप्राय मागितला होता. तर ॲड. विजय मराठे यांनी स्पष्ट शब्दात अभिप्राय दिला होता. जलकुंभ असलेले क्षेत्र हे अतिसंरक्षित (अतिसंवेदनशील) क्षेत्र म्हणून घोषित असते. तिथे कोणत्याही प्रकारचे अन्य बांधकाम किंवा बाधित गोष्टी करण्याला पूर्ण मज्जाव असतो.

आता हा विधी सल्लागाराचा अभिप्राय देखील प्रशासनाने गुंडाळून ठेवलाय. शिवाय त्या जागेवर नुसतेच सुलभ शौचालय बांधलेले नाही. तर गावभरातून कचरा गोळा करून येणाऱ्या "कचरा गाड्यांचे (घंटागाडीचे) आगार देखील केले आहे. जिथून अध्यार्हून अधिक शहराला पाणीपुरवठा होतो, त्याजागेवर शासनमान्य अतिक्रमण ऑलरेडी झाले आहे.

शहराच्या नव्या प्रस्तावित आरक्षणाच्या आराखड्यावर आम्ही गळे काढून रडत असताना कोणताही समाजकारणी कपड्याची इस्त्री मोडायला तयार नाही. आम्ही नागरिक मात्र "पादरा"वास सहन करायला सज्ज झालो आहोत. या आणि जुळे सोलापुरात पैसे देवून आपले मलमूत्र विसर्जित करून जा.....!

**मुकुंद मधुकरराव हिंगणे**
**(यांच्या फेसबुक वॉल वरून)**

# हफ्ते थकवले, बँकवाल्यांनी गाडीसह मुलाला उचललं; गोडावूनमध्ये डांबलं

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरात एका खासगी बँकेचे हफ्ते थकवल्यानं कर्जदाराच्या मुलालाच डांबून घातल्याची धक्कादायक घटना घडलीय. या प्रकरणी सोलापुरात तिघांविरोधात गुन्हा दाखल कर ण्यात आला आहे. १ फेब्रुवारीला एका तरुणाचं अपहर ण झाल्याची तक्रार पोलिसात दाखल झाली होती. याचा तपास केल्यानंतर सगळा प्रकार उघडकीस आला. चार चाकी गाडीवर कर्ज घेतले होते. त्याचे हफ्ते थकवल्यानं वाहनासह कर्जदाराच्या मुलालासुद्धा उचलून नेण्यात आलं. सोलापूरमध्ये जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या प्रकरणी पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतलंय.




याबाबत मिळालेली माहिती अशी की, १ फेब्रुवारीला जेल रोड पोलीस ठाण्यात एका तरुणाचं अपहरण झाल्याची तक्रार करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास केल्यानंतर बँक कर्मचाऱ्यांनीच तरुणाचं अपहरण केल्याचं समोर आलं. चारचाकी वाहनाचे हफ्ते न भरल्यानं गाडीसह मुलाला उचलून नेण्यात आलं. सोलापुरातील या खासगी बँखेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या या कृत्यामुळे संतापाची लाट उसळलली आहे.

अपहरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केलीय. कर्जदाराच्या मुलाचं अपहरण केल्यानंतर त्याला एका गोडाऊनमध्ये डांबून ठेवलं होतं.

अपहरण करणाऱ्यांची नावे शकिल बोंडे, इमरान शेख, देवा जाधव या तिघांवर गुन्हा दाखल केलाय. तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं असून अधिक तपास केला जात आहे. वसुली कर्मचाऱ्यांनी कर्जदाराच्या मुलाला गाडीसह उचललं. मुलाला सोडण्यासाठी दहा हजारांची खंडणीही मागितली असल्याचं पोलीस तपासात समोर आलंय. जबरदस्तीने वसुली करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करणार असल्याचं पोलीस उपायुक्तांनी सांगितलं. तसंच अशी वसुली कोणी करत असेल तर कर्जदार, नागरिकांनी संपर्क साधा असं आवाहनही पोलिसांनी केलंय.

# लोकशाही दिनात 26 शासकीय कार्यालयाकडे 54 तक्रार अर्ज

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन घेण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आजच्या लोकशाही दिनात जिल्ह्यातील 26 शासकीय कार्यालयातच्या 54 तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या तक्रारी संबंधित कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असून त्या कार्यालयानी तात्काळ या तक्रारींचा निपटारा करावा, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी दिले.



यावेळी उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख प्रांताधिकारी सुमित शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत इशाधीन शेळकंदे, जिल्हा प्रशासनाधिकारी नगरपालिका विना पवार, अन्न व औषध प्रशासनचे साहेबराव देसाई, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

**लोकशाही दिनात संबंधित शासकीय कार्यालयाकडे आलेल्या तक्रारी पुढील प्रमाणे...**

मुख्य कार्यकारी अधिकारी - 9, पोलीस अधिक्षक- 1, पोलीस आयुक्त - 2, जिल्हा अधिक्षक, भूमिअभिलेख- 1, आस्थापना जिल्हाधिकारी कार्यालय - 4, सिव्हील सर्जन, सोलापूर-1, कामगार आयुक्त-1, सार्वजनिक बांधकाम विभाग-6, गौणखनिज शाखा-2, महसूल शाखा-3, तहसिलदार, बाशी-1, भीमा पाटबंधारे विभाग-1, तहसिलदार, उत्तर सोलापूर-1, कृषी विभाग, सोलापूर-2, जिल्हा मृद जलसंधारण विभाग-1, महावितरण, सोलापूर-2, तहसिलदार, मोहोळ -3, प्रबंधक जिल्हा अग्रणी बँक, सोलापूर-1, वन विभाग-2, जातपडताळणी विभाग-1, भूसंपादन शाखा-1, तहसिलदार, दक्षिण सोलापूर-2, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय-2, उपविभागीय अधिकारी, पंढरपूर-1, इतर अर्जदार यांना उत्तर देणे-2, दुय्यम निबंधक -1 असे एकूण 54 तक्रारी अर्ज प्राप्त झाले.






उजळावया आली वाटा । खरा खोटा निवाडा ।।

**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे 'समाजदिन'**

मंगळवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२५, सकाळी ०८.०० वा.

बार्शी शहरातून जनजागरणाची भव्य मिरवणूक

★ मुख्य कार्यक्रम ★

मंगळवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं ०४.०० वा.

★ प्रमुख पाहुणे ★

मा. डॉ. अशोक चौसाळकर
विचारवंत, राज्यशास्त्र विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

★ अध्यक्ष ★

मा. श्री. बाबा भांड
सुप्रसिद्ध साहित्यिक, प्रकाशक (छत्रपती संभाजीनगर)

★ सन्माननीय उपस्थिती ★

मा. श्री. दिलीप सोपल (आमदार, बार्शी)
मा. श्री. ओम राजेनिंबाळकर (खासदार, धाराशिव)
मा. श्री. राजेंद्र राऊत (माजी आमदार, बार्शी)

या कार्यक्रमात वीरमाता, वीरपत्नी यांचा सत्कार करण्यात येईल.
आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

★ आपले विनीत ★

श्री. प्रकाश पाटील (जनरल सेक्रेटरी)
श्री. नंदकुमार जगदाळे (उपाध्यक्ष)
डॉ. बी. वाय. यादव (अध्यक्ष)
श्री. अरुण देवडवार (जॉईंट सेक्रेटरी)
श्री. जयकुमार शितोळे (खजिनदार, चेअरमन, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग)

कर्मवीर
डॉ. मामासाहेब
जगदाळे
'समाजदिन'

।। एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।।
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी

**कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाज परिवर्तन गौरव पुरस्कार**

।। सस्नेह निमंत्रण ।।

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाज परिवर्तन गौरव पुरस्कार प्रदान सोहळा



★ शुभहस्ते तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष ★
मा. श्री. हरिभाऊ बागडे
(मा. राज्यपाल, राजस्थान)

★ पुरस्कारार्थी ★



पद्मविभूषण
मा. प्रो. रघुनाथ माशेलकर
(माजी महासंचालक, विज्ञान आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली)



पद्मविभूषण
मा. प्रो. अनिल काकोडकर
(संचालक, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान परिषद, मुंबई)

★ सन्माननीय उपस्थिती ★

मा. श्री. राजेंद्र राऊत (माजी आमदार, बार्शी)
मा. श्री. दिलीप सोपल (आमदार, बार्शी)
मा. श्री. ओमराजे निंबाळकर (खासदार, धाराशिव)

★ आपले विनीत ★

श्री. पी. टी. पाटील (सचिव)
श्री. एन. एन. जगदाळे (उपाध्यक्ष)
डॉ. बी. वाय यादव (अध्यक्ष)
श्री.ए. पी. देबडवाड (सहसचिव)
श्री. जे. सी. शितोळे (खजिनदार व चेअरमन, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग)

दिनांक व वेळ : बुधवार दि. ०५/०२/२०२५ सकाळी १०.०० वा.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी | स्थळ :- कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी.

## संपादकीय

# दावे फोल

महाकुंभमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत 30 जणांना प्राण गमवावे लागले. हा सरकारी आकडा असल्यामुळे त्यावर विश्वास ठेवण्याशिवाय पर्याय नाही. कदाचित ही संख्या जास्त असू शकते. मुद्दा हा आहे की एवढे लोक एकाच ठिकाणी एकाच वेळी मृत्युमुखी पडले ते कोणत्या नैसर्गिक आपत्तीमुळे नाहीत, तर मानवी गलथानपणामुळे. हा गलथानपणा तेथील प्रशासनाचा आहे तेवढाच भाविकांचा आहे.

भाविकांच्या श्रद्धेला बोल लावण्याचे कारण नाही. मात्र, भाविकांनीही जरा संयम बाळगत कृती केल्या आणि जबाबदारीने वागण्याचा प्रयत्न केला तर अशा अनेक घटना टाळता येऊ शकतात. तथापि, धार्मिक ठिकाणी गेल्यावर भाविकांचा संयम संपतो. ते भगवंताच्या चरणी लीन होण्यासाठी एवढे उतावीळ होतात की त्यांचा इहलोकाचा प्रवास संपवत परलोकाचीच ते वाट धरतात. त्यांच्या पातळीवर जसा हा अतिश्रद्धा आणि अति उतावळेपणा त्यांच्यासकट अन्य सर्वांना जाचदायक ठरतो तसाच प्रशासनाचा गलथानपणाही अंतिमतः मुळावर उठतो.

कुंभमेळ्यात बुधवारी झालेली घटना पहिली आणि एकमेव नाही. सातत्याने अशा घटना घडत आल्या आहेत. त्यात चाळीस-पन्नास लोकांचा बळी जातो आणि काही क्षणांची हळहळ व्यक्त करून मागच्या पानावरून पुढे सुरू राहते. कुंभ दुर्घटनांमध्ये आतापर्यंत झालेल्या एकूण मृत्यूंचा आकडा काढायचा झाला, तर तो हजाराच्या वर जातो. त्यातून धडा काय घेतला याचा विचार करायची वेळ येते तेव्हा उत्तर शून्य हेच असते. प्रत्येक वेळी केलेल्या मोठमोठ्या दाव्यांच्या विपरीत कुठेतरी काहीतरी त्रुटी राहिलेलीच असते. कुठे ढिसाळपणा तर कुठे अंगवळणी पडलेला बेशिस्तपणा असतो.

महाकुंभ सुरू होण्यापूर्वीच त्याची प्रचंड प्रसिद्धी झाली होती. मुळात महाकुंभ हा असा प्रकार आहे की हिंदू धर्मीयांना त्याचे वेगळे महत्त्व जाहिरातबाजी करून सांगण्याची गरज नाही. त्यातही मौनी अमावास्येला आणि अन्य वेळा होणारे पवित्र स्नान आणि त्याचे धार्मिक महत्त्व हे जुन्याजाणत्या लोकांपासून ते आजच्या सोशल मीडियाच्या पिढीपर्यंत सगळ्यांनाच चांगलेच ठाऊक आहे. दर कुंभमेळ्याला मग तो प्रयागराजचा असो अथवा नाशकातील तेथे लाखोंच्या नव्हे तर करोडोंच्या संख्येने भाविक येतात. आताही प्रयागराज महाकुंभला 40 कोटी भाविक येणार अशी वदंता होती व ते खरेही आहे.

जर एवढी गर्दी होणार आहे, तर त्याचे नियोजन त्या प्रकारचे झाले आहे का, याचा विचार कोणी करायचा. दुर्घटना घडल्यावर प्रत्येक वेळी तत्कालीन कारण पुढे केले जाते. अचानक गर्दी उसळली किंवा भाविकांनी अचानक धाव घेतली वगैरै सांगितले जाते. तेवढे सांगून गेलेले जीव परत येत नाहीत. गर्दी होणारच आहे व तिचा अंदाजे आकडा किती असेल याची आपल्याला अगाऊ कल्पना असून आपणच ती संख्या कौतुकाने सांगत असू तर एवढ्या लोकांचा प्रवास सुकर आणि सुखरूप होईल इतपत आपली यंत्रणा सक्षम आणि सज्ज आहे का, याचा अदमास कसा लागत नाही.

गर्दीचे योग्य व्यवस्थापन करण्यात यंत्रणा कमी पडली हा एकच निष्कर्ष दुर्घटना घडल्यावर काढता येतो. कुंभमेळ्याच्या ठिकाणीच काही दिवसांपूर्वी आग लागल्याची घटना घडली. त्याची फारशी चर्चा झाली नाही. भीतीचे वातावरण पसरू नये किंवा अफवांचे पेव फुटू नये म्हणून ही खबरदारी घेतली असेल. कालही घटना घडल्यानंतर तब्बल 17 तासांनी किती लोकांचा मृत्यू झाला व किती जण नेमके जखमी झाले हे सांगण्यात आले. लगेचच आकडा जाहीर केला असता तर कदाचित अधिक हानी झाली असती हेही समजून घेता येते.

मात्र पहिल्यांदाच जेव्हा आगीची घटना घडली तेव्हा त्रुटी राहिल्या आहेत याचा तो ट्रेलर होता याची जाणीव तेव्हा झाली नव्हती का? ती जर झाली असती तर मौनी अमावास्येची संभाव्य गर्दी ध्यानात घेऊन योग्य तयारी केली गेली असती किंवा करता येऊ शकली असती. एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे महाकुंभ असल्यामुळे शहर आणि नदीचा परिसर काही विस्तारणार नाही. तो जेवढा आहे तेवढाच राहणार आहे व गदीर्चा जेवढा भार सोसण्याची त्याची क्षमता आहे तीही तेवढीच राहणार आहे. अचानक संपूर्ण शहराच्या लोकसंख्येच्या पाचपट किंवा सहापट गर्दी तेथे अवतरली तर एवढ्या लोकांना सामावून घेणार तरी कसे? रेल्वे, बस, विमान, खासगी वाहने अशा सर्वच माध्यमातून प्रयागराजकडे गदीर्चा ओघ सुरू आहे. महामार्गही तुंबले आहेत. तेथे अडकलेल्या प्रत्येकाला वेगवेगळ्या अडचणींचा सामना करावा लागला. देशाच्या कानाकोर्पयातून ही गर्दी आली आहे. लोकांनीही संभाव्य स्थितीचे आकलन करूनच धाव घेतलेली बरी असते. केवळ कुंभमेळ्याच्याच ठिकाणी नाही तर अन्य सर्वच धार्मिक ठिकाणांनाही हे लागू होते व सगळ्यात महत्त्वाचे असते ते म्हणजे संयम आणि स्वयंशिस्त. भारतातील धार्मिक ठिकाणी होर्णाया दुर्घटनांबाबत कायम एकच सत्य आहे की त्या ठिकाणी पोहोचल्यावर जो गोंधळ तेथे पाहायला मिळतो तो श्रद्धेसोबत सबुरी ठेवल्यावरच दूर करता येऊ शकतो. तो वैयक्तिक पातळीवरच करता येईल, प्रशासनाकडून अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही.

# फेब्रुवारीतच कडक ऊन..

## पारा ३६ अंश सेल्सिअस तापमान आणखी वाढणार :

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कधी गारवा तर कधी उन्हाचे चटके असे वातावरण मागील काही दिवसांपासून सोलापुरात जाणवत आहे. फेब्रुवारी महिन्याच्या १ तारखेपासूनच कमाल तापमानाने ३६ अंश सेल्सिअसचा आकडा पार केला आहे. रविवारी तर तापमान ३६.०४ अंश सेल्सिअस होते.सध्याचे वातावरण पाहता दुपारी उन्हाचे चटके बसत आहेत. मात्र, अद्याप उकाड्याला सुरुवात झाली नाही. येत्या काही दिवसांमध्ये सोलापूर शहर व जिल्ह्याच्या तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे थोडीफार थंडी आहे ती जाऊन उकाड्याला सुरुवात होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार,फेब्रुवारी महिन्यात संपूर्ण भारतभर उन्हाच्या झळा जाणवणार असून किमान यंदा उकाडा अधिकच २०२४ च्या तुलनेने २०२५ मध्ये उकाडा अधिक राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मागील वर्षापेक्षा यावर्षी दोन अंश सेल्सिअसने तापमान जास्त असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे यावर्षी मागील वर्षीपेक्षा अधिक उकाडा जाणवतो की काय,अशी शक्यता वर्तवली जात आहे. व कमाल तापमान सरासरीहून अधिक तापमान राहणार आहे. मागील आठवड्यापासून थंडी कमी झाली असून पहाटे हलका गारवा आणि दुपारी उन्हाचे चटके बसू लागले आहेत.पॅसिफिक महासागरात सध्या ला नीना सक्रिय असून समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीहून जास्त आहे. एप्रिलपर्यंत ही स्थिती कायम राहणार असून त्यानंतर याचे परिणाम कमी होण्यास सुरुवात होईल. संपूर्ण देशातील हवामानावर याचा परिणाम होतो आहे.

# देशप्रेमी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे



४ फेब्रुवारी बार्शी आणि धाराशिव परिसरात "समाज दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. आम्हां साऱ्यांचे प्रेरणास्थान कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची १२२ वी जयंती. कर्मवीरांच्या परिसस्पशार्ने पुनीत झालेल्या भाग्यवंतापैकी एक आदरणीय कै. श्री. कृष्णाजी बाजीराव भालके गुरुजी. श्री शिवाजी बोर्डिंगचे अगदी प्रारंभीचे विद्यार्थी. कर्मवीर जगदाळे मामांच्या तालमीत तयार झालेले संस्थेचे एक निष्ठावंत कार्यकर्ते. त्यांच्याशी सहज बोलतानाही ते कर्मवीरांच्या आठवणी भराभरा सांगत असत. त्यांना प्रसंगाचे वर्ष आठवत नसे परंतु घटना आजच घडत आहेत अशा अविभार्वात ते सांगत असत. त्यांच्या तोंडून ऐकलेली घटना आपल्यासमोर आज जयंतीच्या निमित्ताने सादर करीत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी आपापल्या परीने प्रयत्न केलेले दिसून येतात. हे देश प्रेमाचे कार्य करीत असताना इंग्रजांनी अनेकदा अनेक नेत्यांना अटक केली होती. त्याचबरोबर वेगवेगळे जुलमी कायदे व नियम तयार करून त्यांची अंमलबजावणी करणे अशा अनेकविध मागार्चा अवलंब केला होता. यातीलच एक भाग म्हणून काश्मीर प्रांतात पंडित नेहरूंना इंग्रजांकडून अटक करण्यात आली होती. त्याच्या निषेधार्थ देशभर मोर्चे काढण्यात आले होते. बार्शीतही त्यावेळी विद्यार्थी संघटनेमार्फत एक भव्य दिव्य असा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात मामांच्या परवानगीने भालके गुरुजींसह अनेक बोर्डिंगचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी बाशीर्तील सर्व डाळ कारखाने, जुनी गिरणी, तेलघाणे आणि सर्व प्रकारची दुकाने बंद ठेवण्यात आली होती. बाशीर्तील सर्व व्यवहार ठप्प झाले होते. तरी परंतु त्यावेळीची जयशंकर मिल आणि आत्ताची बार्शी टेक्स्टाईल मिल मात्र चालू ठेवण्यात आली होती. बार्शी तील सर्व व्यवहार ठप्प झाले असतानाही मिल चालू ठेवल्यामुळे हे विद्यार्थी संघटनेच्या लक्षात आल्यावर त्यांनी आपला मोर्चा जय शंकर मिलकडे वळवला. मिलच्या बाहेरच्या बाजूला रखवालदार उभे होते. त्यांना सांगून मिल बंद करण्यासाठी आवाहन करण्यात आले. पण मिल काही बंद होण्याची चिन्हे दिसेनात. हे लक्षात आल्यावर मोचार्तील एका विद्याथ्यार्ने मिलच्या दिशेने एक दगड भिरकावला. त्या दगडाने मिलच्या खिडकीचे एक तावदान फुटले. हे पाहून मिलच्या मॅनेजरने लगेचच पोलीस ठाण्याला फोन लावला. लगेचच पोलीस गाडी फौजफाट्यासह मिल जवळ आली आणि कशाचाही विचार न करता पोलिसांनी भराभर गाडीतून खाली उड्या टाकून विद्यार्थ्यांना मारण्यास सुरुवात केली. ही मारहाण सहन न झाल्याने विद्यार्थ्यांची पळापळी सुरू झाली. यामध्ये बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांचा देखील समावेश होता. बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांना देखील मार बसला होता आणि याला भालके गुरुजी देखील अपवाद नव्हते. शेवटी बोर्डिंग चे सर्व विद्यार्थी तळ्याकडून परंडा रस्ता मार्गे धावत पळत बोर्डिंग पर्यंत पोहोचले. सर्व विद्यार्थ्यांची मामा चातकासारखी वाट पाहत उभे होते. मामांना घडलेला सर्व प्रसंग विद्यार्थ्यांनी सांगितला. मामांनी सर्व विद्यार्थ्यांची विचारपूस केली. कोणाला काही जास्त लागले नाही ना याची कपडे काढून आईसारखी पाहणी केली. सर्व विद्यार्थी बोर्डिंग मध्ये सुखरूप पोहोचल्याची खात्री मामांना झाली. त्यांनी ती खात्री व्यक्तिशः करून घेतली आणि नंतरच शांतपणे खाली बसून एक तांब्याभर पाणी प्यायले. मामांनी देश प्रेमापोटी प्रसंगी आपल्या पोटच्या गोळ्याप्रमाणे सांभाळलेल्या लेकरांना देखील मोर्चामध्ये सहभागी होण्यास सांगितले होते. यातून मामांच्या प्रति देशाबद्दल असलेले निस्सीम प्रेम दिसून येते.

तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील महात्मा गांधींच्या कायार्चे मामांना खूपच आकर्षण होते. देशातील गोरगरीब जनतेस अंगभर कापड मिळत नाही आणि आपणास सुटाबुटात राहण्याचा अधिकार कुठून प्राप्त झाला? हे गांधीजींनी जाणून आणि एका ध्येयाने प्रेरित होऊन बॅरिस्टर पदवी मिळवलेल्या या तरुणाने आपल्या शाही पोशाखाचा त्याग करून एकाच धोतरामध्ये आपले अंग गुंडाळून पूर्ण आयुष्य सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी वेचले. अशा या थोर महात्म्याच्या आचारांचा आणि विचारांचा मामावर प्रभाव पडलेला होता. मामांनीही आपला देह दीनदलीत गोरगरीब यांच्या कल्याणासाठी वेचल्याने महात्मा गांधी व मामा यांच्या आचार विचारात सारखेपणा दिसून येतो. त्यावेळी ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी महात्मा गांधींना उद्देशून महात्मा गांधी हा "नंगा फकीर" आहे असे उद्गार काढले होते. अशा या नंग्या फकीराच्या पाठीमागून धावणारी भारताची जनता काय लायकीची आहे? हे समजते. असे उपरोधिक टीकास्त्र चर्चिल यांनी त्यावेळी सोडले होते. त्याचे पडसाद सर्व भारतभर त्यावेळी उमटले होते. विद्यार्थी संघटनेमार्फत देखील याचा सर्वदूर निषेध नोंदवला जात होता. त्याचाच एक भाग म्हणून बाशीर्तील विद्यार्थी संघटना प्रमुख श्री मडके यांनी विद्यार्थी संघटनेची सभा बार्शीत आयोजित केली होती. या सभेत बोर्डिंगचे विद्यार्थी श्री नागनाथ बारस्कर यांचे भाषण झाले. मामांच्या तालमीत तयार झालेले बारस्कर यांनी त्यावेळी विन्स्टन चर्चिल यांच्या वक्तव्यावर तोफ डागली होती. त्यांनी आपल्या भाषणात ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांना आवाहन केले होते, "चर्चिल, अहो चर्चिल! तुम्हाला आमचे पूज्य महात्मा गांधी नंगा फकीर वाटतो का? या नंग्या फकीराला भेटण्यासाठी आणि त्याचे पाय धरण्यासाठी तुम्हाला वर्ध्याच्या वाऱ्या कराव्या लागतील त्यांचे प्रेम असलेल्या चरख्याच्या प्रभावाने तुमची हातची सत्ता निघून जाईल आणि या वर्ध्याच्या संताच्या पायाची धूळ तुम्हाला तुमच्या मस्तकाला लावून घ्यावी लागेल." एवढे बोलून बारस्कर थांबले नाही तर त्यांनी भर सभेत अशा या घमेंडखोर चर्चिलला जोड्याने मारावे असे आवाहन केले होते. नागनाथ बारस्करांचे हे भाषण ऐकून अनेक जण प्रेरित झाले होते आणि प्रत्येक जण आपापल्या परीने स्वातंत्र्याच्या या लढाईत सहभागी होण्यासाठी तयार झाले होते. यानंतर नागनाथ बारस्करांची अनेक ठिकाणी अनेक भाषणे झाली होती. प्रत्येक भाषणात आपले म्हणणे पद्धतशीरपणे मुद्देसूद मांडण्यात नागनाथ बारस्कर अग्रस्थानी होते. त्याचे सर्व श्रेय पूज्य मामांच्या ध्येय धोरणांना आणि कायार्ला जाते, असे शेवटी भालके गुरुजी म्हणाले.

मम हृदयाच्या आठवणीतून<br>
कंठ आज दाटला,<br>
प्रेम भावना, लोभामधुनी<br>
मेघ आजी बरसला,<br>
त्यागाच्या भरतीतून होईल,<br>
अमर आज त्रिभुवनी,<br>
अखंड स्मरतो तव<br>
त्यागाला नतमस्तक होऊनी.

**- डॉ. विष्णू पांडुरंग शिखरे,** प्राध्यापक, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

# 'संभाजी आरमार'च्या वतीने दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन शिबीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त 'संभाजी आरमार' च्या वतीने २ ते ८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत दररोज सायंकाळी ६ वाजता पद्मशाली चौक येथील शालीवाहन सभागृह येथे इयत्ता दहावी विद्यार्थ्यांसाठी पाठ्यक्रमातील विविध विषयांवर मोफत मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष तात्यासाहेब वाघमोडे यांनी दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष अजिंक्य पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख राजाभाऊ आखाडे, शहराध्यक्ष शिवानंद कटके, शहर उपाध्यक्ष राहुल काशीद आदी उपस्थित होते.

रविवार, २ फेब्रुवारी रोजी हिंदी या विषयावर संभाजी कदम. सोमवार, ३ फेब्रुवारी रोजी मराठी या विषयावर चेतन देड. मंगळवार, ४ फेब्रुवारी रोजी इंग्रजी या विषयावर शहाजी नीळ व प्रमिला आखाडे. बुधवार, ५ फेब्रुवारी रोजी गणित भाग - १ या विषयावर युवराज चव्हाण. गुरुवार, ६ फेब्रुवारी रोजी गणित भाग-२ या विषयावर दिगंबर लोखंडे. शुक्रवार, ७ फेब्रुवारी रोजी विज्ञान या विषयावर श्रीकांत कदम. शनिवार, ८ फेब्रुवारी रोजी समाजशास्त्र या विषयावर गणेश राठोड व यशवंत बिराजदार हे मार्गदर्शन करणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी ओळख क्रमांकासाठी नोंदणी करावी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासनाच्या विविध कृषीसंलग्न योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलदगतीने व अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक दिला जात आहे. उत्तर सोलापूर तालुक्यामधील सर्व गावामध्ये ॲग्रिस्टॅक योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीची कार्यवाही सुरु असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करण्याचे आवाहन तहसिलदार निलेश पाटील यांनी केले आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यात गावातील ग्राम महसूल अधिकारी यांना दि. ४ व. ५ फेब्रुवारी २०२५ या दोन दिवसामध्ये गावातील CSC चालक व महा ई सेवा चालक यांना सोबत घेऊन मोहिम स्वरुपात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक काढले जाणार आहेत. आपल्या गावच्या ग्राम महसूल अधिकारी यांना दि. ४ व ५ फेब्रुवारी २०२५ या दोन दिवशी गावामध्ये उपस्थित राहून सदरचे कामकाज मोहिम स्वरुपात करण्याच्या सूचना या कार्यालयाकडून दिलेल्या आहेत.

सर्व शेतकरी यांनी आपले आधारकार्ड (मोबाईक नंबर लिंक असलेले) घेऊन आपले गावचे ग्राम महसूल अधिकारी, CSC चालक व महा ई सेवा चालक यांचेशी संपर्क साधून शेतकरी ओळख क्रमांक तयार करुन घ्यावा. असे आवाहनही तहसिदार श्री पाटील यांनी केले आहे.

## प्रबोधन

# मुहूर्ताचे वेड । मूर्खांना शोभते

न कर्त्याचा वार शनिवार ह्या बहुप्रचलित म्हणीचं नाकर्तेपणाचा वार शनिवार असं रूपांतर केल्यास तिचा अर्थ अधिक स्पष्ट होईल. शनी नावाच्या एका निर्जीव ग्रहाची सामान्य लोकांच्या मनावर केवढी दहशत आहे, ते त्या म्हणीतून सहज कळतं. ही माणसं शनिवारी कोणतंही काम करायला धजत नाहीत. भीती हाच अशा लोकांच्या मनाचा स्थायीभाव असतो. अशा भित्र्या लोकांविषयी विवेकानंद स्पष्टपणे म्हणतात, 'भीती हेच माणसाच्या अधःपाताचं निश्चित कारण आहे!' प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक क्षणी जी माणसं उठता, बसता, झोपेत किंवा जागेपणी भयग्रस्त होऊनच जगतात, ती कोणतंच काम करीत नसतात. त्यांचं वर्णन किंकर्तव्यविमूढ (काय करावं हे न कळणारे मूर्ख) अशा शब्दानेच करावं लागतं. आपल्या देशात अशा लोकांची संख्या एवढी प्रचंड आहे की, भारत देशऐवजी किंकर्तव्यविमूढांचा देश असं म्हणणं योग्य होईल. ही माणसं ऊठसूट ज्योतिष्याकडे (हल्ली त्यांना 'गुरुजी' म्हणतात) शुभ वेळ विचारायला पळत असतात. त्याने अमुक दिवस, अमुक वेळ अशुभ म्हटलं की, तिचा ढालीसारखा उपयोग करून आपला आळस, भीती, कामचुकारपणा तिच्यामागे लपवून टाकतात.

पंचांग नावाचं ज्योतिष्यांचं हे दुष्ट पुस्तक स्वातंत्र्यदिन, गणतंत्रदिन, गांधी जयंती, महात्मा फुले जयंती, विज्ञानदिन अशा प्रसंगी जाहीरपणे जाळण्याच्या लायकीचं आहे. पंचांगाच्या आज्ञा मानणारे लोक मूखार्च जीवन जगतात. प्रत्येक वषार्चे ९०-९५ दिवस पंचांगाने त्याज्य दिवस म्हणून जाहीर केलेले असतात. अमावस्या- पौर्णिमा हे दिवस त्याज्य. पुन्हा पंचकाचे प्रत्येक महिन्यातील ५ दिवस, शिवाय घातवार, घातनक्षत्रे, व्यतिपात युक्त नक्षत्रदिन... याचा अर्थ शासकीय कर्मचारी जसे सहा महिने काम करून वषार्चे वेतन घेतात, त्याप्रमाणे नऊ महिने अशुभ वेळ मानून, आळसात घालवणाऱ्या जनतेचं कल्याण करण्याची ताकद जगात कशातही किंवा कोणातही नसेल.

या उलट काळ-काम-वेगाच्या गणिताशी स्वतःला जुळवून घेणारे प्रगतीची नवी नवी क्षेत्रं पादाक्रांत करतात. पंचांगाच्या जुन्या अंधश्रद्धेने बरबटलेल्या चिखलापासून स्वतःला खूप दूर ठेवतात.

मनुष्य ज्या निसर्गापासून जन्मला तो निसर्ग पंचांग पाहातो का? सूर्य अमावस्येलाही उगवतोच ना? पंचांगातील वेळ अशुभ असली, तरी आकाशात इंद्रधनुष्याचं मनोहारी दर्शन घडतंच ना? पाऊस पडायलाही वेळकाळ नसते नि तो थांबायलाही मुहूर्त लागत नाही. मात्र सामान्य माणसं आणि त्यांचे मूर्ख नेते मात्र शुभाशुभाच्या गटारात लोळतात. आमचे विविध पक्षांचे नेते, उमेदवार, कार्यकर्ते यांना निवडणुकीच्या वेळी उमेदवारीचे फॉर्म भरायला मुहूर्त लागतो. मग त्यानंतर डिपॉझिट जप्त का होईना! प्रचाराचा नारळ मुहूर्तावर फोडणाऱ्यांना अनेकांना तोंडावर आपटण्याच्या घटनेला सामोरं जावं लागतं. शहाण्या बुद्धिमंतांनीही वेळ चांगली की वाईट, हे पाहू नका; तर करावयाचं काम चांगलं की वाईट आहे, ते पाहायला सांगितलं आहे. शुभस्य शीघ्रमहा त्यांचा आदेश हेच सांगतो! चांगलं काम कोणत्याही वेळी करा; त्याचं उत्तम फळ तुम्हाला मिळणार! वाईट काम अमृतसिद्धीयोग, गुरुपुष्यामृत किंवा कपिलाषष्ठीच्या मुहूर्तावर किंवा मणिकांचनयोगावर करूनही उपयोग नाही. हातात बेड्या आणि गळ्याला फास अटळ असेल तर तो लागणारच, लागणार, यात शंका नाही. तेव्हा-

पंचांगाच्या मागे लागतो अडाणी<br>
पाहे क्षणोक्षणी। शुभाशुभ ॥ १<br>
मूर्ख भट म्हणे । त्याज्य दिन आज<br>
दक्षिणेची लाज । बाळगेना ॥२<br>
कामचुकारांना। धार्जिणे पंचांग<br>
सडलेले अंग। संस्कृतीचे ॥ ३<br>
मुहूतार्चे वेड । मूखार्ना शोभते<br>
आयुष्य नासते। पंचांगाने ॥४<br>
चांगल्या कामाला लागावे कधीही<br>
गोड फळ येई । कष्ट घेता ॥५<br>
दुष्ट कामे केली। शुभ वेळेवरी<br>
माफी नाही तरी । शिक्षेतून ॥६<br>
वेळ, हवा, पाणी । आकाशा बाधेना<br>
भटांच्या कल्पना । शुभाशुभ ॥७<br>
विवेकाने वागा। होऊनी निर्भय<br>
अशुभाचे भय । निर्बुद्धांना ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# निरोगी जीवनशैली, नियमित तपासणी व उपचाराने कॅन्सर 100% बरा होतो - डॉ. शिरीष कुमठेकर

## जागतिक कॅन्सर दिनानिमित्त जनजागृती व मार्गदर्शन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निरोगी जीवनशैली, नियमित तपासणी व उपचाराने कॅन्सर आजार 100% बरा होतो. असे मत डॉ. शिरीष कुमठेकर यांनी जागतिक कॅन्सर दिनाचे औचित्य साधून भारतीय जैन संघटना आणि जेनस्को यांच्या संयुक्त विद्यमाने महावीर सांस्कृतिक भवन येथे आयोजित मार्गदर्शन शिबिरात बोलत होते.



या मार्गदर्शन कार्यक्रमाची सुरुवात पंकजा पंडित यांनी णमोकार महामंत्र्याने केली. डॉ. शिरीष कुमठेकर पुढे म्हणाले की, "कॅन्सर हा आजार पहिल्या, दुसऱ्या, स्थितीमध्ये शंभर टक्के बरा होतो. त्यासाठी आपण न घाबरता कॅन्सरची तपासणी करावी. तिसऱ्या, चौथ्या, स्थितीमध्ये आजार माहीत झाला तर बरा होण्यासाठी वेळ लागतो आणि 60% रुग्ण बरे होण्याची शक्यता असते" यावेळी डॉ. विपुल दोशी म्हणाले की, आधुनिक उपचार, नवीन औषधे, स्क्रीनिंग टेस्टमुळे कॅन्सर बरा होतो. तसेच डॉ. योगेश बंग यांनी केमोथेरेपीचे महत्त्व सांगितले. डॉ. सरिता कोठाडिया यांनी स्त्रियांना स्तनाचे व गर्भाशयाचे कॅन्सर होण्याची शक्यता असते, त्यासाठी नियमित तपासणी करुन, त्यावर उपचार केल्यास आजार बरा होतो, असे मत व्यक्त केले.

उपस्थित मान्यवरांचे स्वागत जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे यांनी केले. राज्याध्यक्ष केतनभाई शहा यांनी आपल्या प्रास्ताविकेत भारतीय जैन संघटना व जैनस्कोने केलेल्या समाजोपयोगी आणि लोकोपयोगी कायार्ची माहिती दिली. कर्करोग जनजागृतीचे महत्त्व सांगितले. यावेळी डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी महिलांना 4 फेब्रुवारीला दुपारी बारा ते तीन या वेळेत दमाणी रक्तपेढी डफरिन चौक येथे तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास श्याम पाटील, अभिनंदन विभुते, माया पाटील विक्रांत बशेट्टी, महावीर नळे, अजितकुमार शहा- भूमकर, नंदकुमार कंगळे, प्रशांत वायकसकर, रेवती शहा-भूमकर, विमलनाथ गुमते सह दोन्ही संघटनांचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यसचिवा संतोष बंब यांनी केले तर जैनस्कोचे कोषाध्यक्ष अरुणकुमार धुमाळ यांनी आभार मानले.

# शहरात मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** माघ शुध्द एकादशी 08 फेब्रुवारी 2025 रोजी असून, माघ यात्रा कालावधी दि. 02 ते 12 फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या वारी कालावधीमध्ये दि.07 ते 09 फेबुवारी 2025 या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी श्री.इथापे यांनी सदर आदेश निर्गमित केले आहेत.

# मंदीर परिसरात नारळ फोडण्यास व विक्रीस मनाई

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** माघी यात्रेनिमित्त पंढरपूर शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी व भाविकांकडून नामदेव पायरी व मंदीर परिसरात नारळ फोडण्याने नारळाचे पाणी रस्त्यावर येवून चिखल व घसरंती होण्याची शक्यता आहे. तसेच विक्रेते नारळाची साल काढून मंदिर व मंदिर परिसराच्या बाजूस टाकल्याने केसरास आग लागण्याची शक्यता असल्याने. श्री विठ्ठल -रुक्मिणी मंदिर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये दि. 06 ते 09 फेब्रुवारी 2025 या कालावधीत नारळ फोडण्यास व विक्री करण्यास मनाई करण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

## वात्रटिका

### म्हणे पुन्हा जुळणार

पुन्हा त्यांचे जुळणार<br>
आणि ते जवळ येणार...<br>
कांहीं घडते इथे म्हणून<br>
नवल नाही वाटणार...<br>
न लायकाच्या ओळीत<br>
बेशरमांची गर्दी झाली...<br>
इज्जत काढली आधी<br>
आणि आता मर्जी जडली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयात नागरिकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करा ; युवक काँग्रेसची मागणी

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** नोंदणी व मुद्रांक विभाग महाराष्ट्र कार्यालय, तसेच पुण्यासह राज्यातील सर्वच दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये दस्त नोंदणी व इतर कामांसाठी जाणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी आसनव्यवस्था आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. राज्याच्या महसूल विभागाला नागरिक दस्त नोंदणीच्या माध्यमातून प्रचंड महसूल निर्माण करून



देत असतात.मात्र, सर्वसामान्य नागरिकांना दस्त नोंदणी कार्यालयामध्ये साधी बसायची सोय उपलब्ध नसल्याचे अनेक ठिकाणी आढळते.

> दस्त नोंदणीच्या माध्यमातून हजारो कोटींचा महसूल नागरिकांमुळे प्रशासनाला मिळत असतो. नोंदणी महानिरीक्षक कार्यालय व राज्यातील अनेक दुय्यम निबंधक कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांना मूलभूत सुविधा मिळत नाहीत. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, सिसीटीव्ही कॅमेरा, प्रतिक्षा कक्ष ह्या गोष्टींची पूर्तता जर अधिकारी करू शकत नसतील तर खेदाची बाब आहे. नागरिकांसाठी तात्काळ सुविधा उपलब्ध करून द्याव्यात ही आमची मागणी आहे.
> – **रोहन सुरवसे पाटील,** सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस

नोंदणी महानिरीक्षकांच्या कार्यालयात नागरिकांसाठी प्रतिक्षा कक्ष उपलब्ध नाही. पिण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. काही कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले होते. परंतू, सद्यस्थितीत ते बंद असल्याचे दिसून येत आहे. यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे.

राज्यभरातील बऱ्याच दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. त्यामुळे नोंदणी कार्यालयात नागरिकांना पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही कॅमेरे, प्रतिक्षा कक्ष उपलब्ध करावेत अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी राज्याचे नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे यांच्याकडे केली आहे. यावेळी पुणे जिल्हा विद्यार्थी काँग्रेस सरचिटणीस कृष्णा साठे, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे, दीपक चौगुले हे उपस्थित होते.

# सेवा मंडळ संचलित राजर्षी शाहू संकुलात 76 वा प्रजासत्ताक दिनात स्काऊट गाईड पथक संचलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाज सेवा मंडळ संचलित, राजर्षी शाहू शिक्षण संकुल, विडी घरकुल येथे 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे हे अध्यक्ष म्हणून व प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक शालेय समिती चेअरमन महेश माने, प्राथमिक विभागाचे महादेव गवळी, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य उदयसिहं पवार, प्राथमिक



विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. महानंदा सोलापुरे, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विजयालक्ष्मी त्यारला हे सर्व मान्यवार कार्यक्रमास उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर कोमीनारे व स्काऊट गाईड पथक संचलन करण्यात आले. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. चिमुकल्यांची भाषणे, देशभक्तीपर नृत्य, राष्ट्रीय एकात्मता नृत्य सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी शुभांगी नांदुरकर यांनी केले तर समारोप विलास माळी यांनी केले. कार्यक्रमास संकुलातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सांगता अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

# प्रभागातील विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावून विकास कामांना चालना दिली- किसन जाधव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच प्रभाग क्रमांक २२ मधील विविध विकास कामांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्यातून सर्वाधिक निधी मंजूर करून घेऊन प्रभागातील नागरिकांना पायाभूत व अत्यावश्यक ठरणाऱ्या विकास कामांना प्राधान्याने प्रत्यक्षात गती देत मार्गी लावण्यात आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी प्रभाग क्रमांक २२ येथील राजीव नगर ते आम्रपाली चौक रस्ता डांबरीकरण शुभारंभ प्रसंगी म्हणाले. दरम्यान सोलापूर महानगरपालिका लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२३-२४ या हेड अंतर्गत २७ लाख १७ हजार ७१९ रुपये खर्चित राजीव नगर ते आम्रपाली चौक रस्ता डांबरीकरण कामाचे शुभारंभ करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, चंद्रकांत चलवादी, सुरेश भंडारे, मोतीलाल करबसू जाधव,



पाटील वकील, रमेशचलवादी, दिनेश चलवादी, बुवा लाकूड अड्डेवाले,भुजंग लामतुरे, यल्लाप्पा लामतुरे,लक्ष्मण कट्टी, शिवाय कलीम, शेख बबलू जगले, सय्यद तायप्पा बेरे, बजरंग भंडारे, जगन्नाथ सुरवसे, अनुसया शिंदे,पर्वती चोपडे, वनिता कोकरे, यशोदा पिसे, तानोबाई टकले, उषाताई कांबळे, राजश्री बोराटे, रहीबाई मस्के, मंगलाताई कोरे, सोनाली हेमगड्डी, भानुबाई पवार, नागुबाई लामतुरे आदींच्या उपस्थितीत या रस्ता डांबरीकरण कामाचे शुभारंभ विधिवत पूजनाने करण्यात आले. दरम्यान राजीव नगर ते आम्रपाली चौक या रस्ता डांबरीकरण कामामुळे आता येथील नागरिकांना वाहतुकीसाठी चांगल्या पद्धतीने उपलब्ध होणार आहे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड यांनी प्रभागातील विकास कामांना चालना दिली आता प्रभागातील कामे पूर्णत्वाकडे येत असल्याने आम्ही समाधानी असल्याची भावना येथील रहिवाशांनी यावेळी व्यक्त केली. प्रभाग २२ येथील रस्त्यांची दुरवस्था झाली होती यामुळे येथील नागरिकांना दळणवळणात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते त्यामुळे रस्त्या दुरुस्तीची मागणी नागरिकांनी केले होते त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्यातून सहकारी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या आणि माझ्या प्रयत्नातून डांबरीकरण कामाचे शुभारंभ करण्यात आला. त्यातीलच राजीव नगर ते आम्रपाली चौक हा प्रभागातील महत्त्वाचा रस्ता आहे या रस्त्याचे काम आता लवकरच पूर्ण होईल प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी आम्ही नेहमी कटिबद्ध आहोत या पुढील काळात देखील प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असणार आहोत अशी ग्वाही देखील यावेळी किसन जाधव यांनी दिली. या रस्ता डांबरीकरण काम शुभारंभ प्रसंगी प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नावात बदल

माझे जुने नाव **उमादेवी अंबादास कोनापूरे** असे होते ते बदलून नवीन नाव **राजश्री राजेंद्र करणकोट** असे आहे . राहणार पत्ता ५ अ विंग चीप्पा रेसीडेन्सी, दाजी पेठ, सोलापूर – ४१३००५.

## Public Notice

O.w NO. /20
Public Trusts Registration Office, Solapur
Address: Public Trust Registration Office, Solapur, 1st Floor, Nai Pride Building, Civil Hospital Puvas, Uttar Sadar Bazar Solapur, Solapur, Solapur

Service Request Number: SLP/13473/18/24
Inquiry/case No.: 1377/2024
Name of the Trust: SHREE SWAMI SAMARTH SANSTHAN AKKALKOT
Address of the Trust: c s no 2558/1B, near mangrule high school, akkalkotSolapur, Akkalkot, Akkalkot Registration Number of the Trust (if): SHREE SWAMI SAMARTH SANSTHAN AKKALKOT
Name of the Applicant : Sandesh Suresh Pujari
To,
All Concerned having interest

Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Greater Mumbai Region. 1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust? 2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

Movable Property

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | corpus fund | 11000.00 |

Value of Movable Property : Rs. 11000/- Only (In Words Rs. Eleven Thousand Only)

Immovable Property

| SRNO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

Value of Immovable Property: Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 03/02/2025.

Copy: 1) On address of the property mentioned above. 2) On Address of the Trust. 3) For Publication in Local Daily News Paper. 4)On Notice Board of this Office 5) (if any Other Please mentioned)......(Note: Please mark the appropriate option)

Stamp

**Sign**
**(S.S.Kumthekar)**
**Superintendent**
**Public Trusts registration Office,Solapur**

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**हुरडा पार्टी**
शालेय सहल व हुरडा पार्टी
आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.
मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११




**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

## अनगर नगरपंचायत, अनगर,

ता.मोहोळ, जि.सोलापूर पिन-४१३२१४
स्थापना - ०१/११/२०२१

दुरध्वनी क्रमांक : ०२१८९-२४८५२३ Email ID: comcangar7@gmail.com

क्र.२०२५/बांधकाम/कावि/२२, दिनांक ०३/०२/२०२५

### Publication of list of modification/changes in draft development Plan of Angar u/s 28 (4) of maharashtra regional planning and Town planning act, 1966

Whereas, Angar nagar Panchayat being planning authority, has published the draft development plan of Angar under section 26 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Administrative Resolution No. 07, dated 20/9/2024 and a public notice in this regard has been published in the Maharashtra Government Gazette Pune Divisional Supplement dated 24-30 October, 2024 on pages 29 and 30. Similarly, the said public notice has been published in the local newspaper Dainik Sayan Update and Dainik Solapur Sanchar News dated 12/10/2024.

And wheras, no objection / suggestion has been received by the Nagar Panchayat on the proposal of the said draft published development plan within the stipulated period.

And wheras, planning authority suggested changes in it and passed Administrative Resolution No. 03, dated 06/01/2025 o make modifications/ changes to the said plan and to submit the said plan for sanction to the government u/s 30 of the said act

And wheras, it is necessary to publish the said modification/ changes made in the said plan for inspection of the public as per section 28(4) of the said act

Now therefore, the list of modifications/ changes made under section 28(4) of the act, by the said planning authority is hereby published as Appendix-A as per the provisions of said act for information of the public. The said draft development plan showing the modofications/ changes is kept open for the inspection of the public in the following offices on all working days during office hours for a period of 30 days.


1. The Chief Officer, Angar Nagarpanchyat
2. Assitant director, Townplanning, solapur branch, Park chowk Solapur

| Modification No. | Details of Modification / Changes |
|---|---|
| M-1 | The alignment of the road connecting Kombadwadi Road to Wafale Road, out of the 30 mtr wide road on the west side of Gat No. 266, 270, 271, is deleted and included in adjoining land use zone as shown on the plan. |
| M-2 | An area admeasuring approximately 0.80 ha. to the North side of the nallah in Gat no. 529, 546, 304, 310 is being reserved for government offices and their staff quarters as shown on the plan. |
| M-3 | Out of the reservation of Res. No. 4- Garden, approximately 0.30 ha. area towards the south side is being reserved as a sewage Treatment Plant, and the remaining area is being retained as Res. No.4-Garden as shown on the plan. |
| M-4 | Res.No.6-Dumping Yard on private land is being shifted on the land of Res. No.17-Cremation Ground. And the area under reservation of Res.No.6-Dumping Yard is being included in the Agriculture Zone as shown on the plan. |

**Place- Angar**
Date-03/02/2025

**Sign**
**(Sachin Mulik)**
**Administrator**
**Angar Nagar Panchayat**

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उष:काल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 167

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | | 8 | 2 | 7 | | 1 | 3 |
| | | 1 | | 4 | | | | |
| 6 | 7 | 2 | | 3 | 1 | 9 | | 4 |
| 7 | 6 | | 1 | | | | | |
| | 1 | | 9 | | 2 | | | |
| | | 8 | | | 4 | 5 | 6 | 1 |
| | | 6 | 2 | | 8 | | 4 | 5 |
| 1 | | 7 | | | | 8 | | |
| | 8 | | | 5 | | | 9 | 6 |

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# मुलांनी पालकांना समजून घेतले पाहिजे : वसंत हंकारे



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** आपल्या राज्याला माता जिजाऊ, छत्रपती शिवराय, नरवीर छत्रपती संभाजीराजे, फुले शाहू आंबेडकर यांचा वैचारिक आणि कृतिशील वारसा लाभला आहे. मुलांनी शिक्षण घेताना हा वारसा सुध्दा समजून घेतला पाहिजे. आपण शिक्षण घेताना संस्कारही जपले पाहिजेत. आपल्या मातापित्यांनी किती काबाडकष्ट करून आपल्याला वाढवली आहे याबाबत आपल्या मनामध्ये कृतज्ञता असली पाहिजे. त्यांनी आपल्या पालकांना समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन वक्ते वसंत हंकारे यांनी केले. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित बाप समजून घेताना या विषयावर हंकारे बोलत होते. यावेळी त्यांनी पालक आणि मुलांच्या नात्यावर मा. अरुण (दादा) बार व्याख्यानमाला विचार व्यक्त करताना हंकारे भावनिक प्रकाश टाकत उपस्थित मुला-मुलींना अंतर्मुख केले अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवशक्ती नागरी सहकारी बँकेचे चेअरमन डॉ.प्रकाश बुरगुटे व यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण बारबोले उपस्थित होते.हंकारे म्हणाले, शिक्षण घेताना मुलांनी आपल्या ध्येयापासून विचलित होता कामा नये. बदलत्या काळामध्ये अनेक मोह प्रलोभणे वाढली आहेत. शाळा महाविद्यालयांमध्ये जाण्याचा मूळ उद्देश हरवत चालला आहे. त्यामुळे मुला- मुलींना मातापित्याबद्दलच्या कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे. पालकांचे अंतकरण वरून दगडासारखे घट्ट दिसत असले तरी त्यांच्या मनामधला जिव्हाळा हा अपरंपार असतो.

हंकारे यांचे विचार ऐकून अनेक मुली गहिवरून रडल्या. तर उपस्थित पालकांनाही अश्रू आनावर झाले. कर्मवीरांच्या जयंतीनिमित्त पालक आणि आपत्यांमध्ये सुसंवाद निर्माण करत नात्यांमधला आदर वाढविणाऱ्या या व्याख्यानाला बार्शीकरांनी दाद दिली. यावेळी संस्थेचे सचिव प्रकाश पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण बडवार, प्राध्यापक किरण गाढवे, प्राचार्य डॉक्टर अब्दुल शेख, व अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वीरतपस्वी शिक्षण संकुलात 'आनंद मेळया'चा शुभारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजींच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री वीरतपस्वी शिक्षण संकुल एमआयडीसी येथे आयोजित केलेल्या आनंद मेळयाचे उदघाटन रविवारी काशी जगदगुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते करण्यात आले.यावेळी सहायक पोलीस आयुक्त राजन माने, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विजय खोमणे, संस्थेचे सचिव शांतया स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे व शिवानंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी केले. या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांकडून ९० स्टॉल उभारण्यात आले आहेत. यामध्ये पहिल्या दिवशी अंदाजे चार लाख रुपयांची उलाढाल झाली. विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ, भाजीपाला व मनोरंजनात्मक खेळ ठेवले आहेत. हॉर्स रायडिंग, जम्पिंग, मिकी माऊस, पाण्यातील होडी याचाही आनंद वालगोपाळांनी घेतला. यातून विद्यार्थ्यांना व्यावसायिकतेचे व्यवहारज्ञान, खरेदी-विक्री, नफा-तोटा यांचे ज्ञान मिळाले. या मेळाव्यास

संस्थेच्या विविध शाखांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व मोठ्या प्रमाणावर पालकांची उपस्थिती होती. या आनंद मेळाव्यासाठी ३०० वाय ५०० मंडप, ९० स्टॉल,राजस्थान पध्दतीचे भव्य प्रवेशद्वार,१ हजार स्क्वेअर फुटाचे एलईडी वॉल, ५०० फोकस लाईटची व्यवस्था करण्यात आली असून परिसरातील शाळा व विद्यार्थ्यांनी या आनंद मेळाव्यास भेट द्यावी, असे आवाहन मुख्याध्यापक म्हमाणे यांनी केले आहे.

# 'स्मार्टसिटी'ला निधीच नाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्रशासनाच्या स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून 784 कोटींचा निधी सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉपोरेट कंपनीला मिळाला. यामाध्यमातून शहरात 731 सर्व कामे पूर्ण झाल्याने महापालिकेकडे हस्तांतरीत केली आहेत. निधीही संपला, नवीन कामही नाही. त्यामुळे केंद्राच्या चालू आर्थिक वर्षाच्या बजेटमध्ये स्मार्ट सिटीच्या निधीला ठेंगा दाखवला आहे. त्यामुळे हा प्रकल्प गुंडाळण्याची शक्यता आहे.

देशातील दहा स्मार्ट शहरामध्ये सोलापूराचा समावेश होता. केंद्रशासन 70 टक्के राज्य शासन 30 टक्के आणि महापालिकेचा हिस्सा 10 टक्के हिस्सा या माध्यमातून शहरात विकासकामे केली जाणार होती. यामध्ये 46 विकास कामाचा डिपीआर तयार करण्यात आला. यातील समांतर जलवाहिनी वगळता सर्व कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे स्मार्ट सिटीने सर्व कामे महापालिकेकडे हस्तांतरीत केली आहेत.



### असा मिळाला निधी

या योजनासाठी केंद्र शासनाकडून 392 कोटी, राज्यशासन 196 कोटी, महापालिकेचा हिस्सा 196 कोटी, असा एकूण 784 कोटींचा निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी 731 कोटींचा निधी खर्च झाला आहे. 52.71 कोटींचा निधी शिल्लक आहे. त्यातून इतर कामे चालू आहेत. मार्चअखेर सगळे संपणार स्मार्ट सिटी प्रशासनाच्या माध्यमतून उजनी समांतर जलवाहिनीचे काम चालू आहे. 31 मार्च अखेर मक्तेदाराला मुदत वाढ दिल्याने काम संपणार आहे. त्यामुळे स्मार्ट सिटीच्या सीईओंची दोन महिन्यांसाठी नियुक्ती शासनाने केली आहे. त्यामुळे मार्चअखेर सोलापूर स्मार्ट सिटीचा बाजार उठणार असल्याचे बोलले जात आहे.

# अर्धा लाख शिक्षक पगारवाढीच्या प्रतीक्षेत; चालू आर्थिक वर्षाचे ११०० कोटी मिळेनात

## 'इतक्या' शाळा व तुकड्यांचे २० टक्के वाढीव टप्पा अनुदान रखडले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील जवळपास अंशतः व विनाअनुदानित तीन हजार शाळा, १५ हजार तुकड्यांना वाढीव २० टक्क्यांचे टप्पा अनुदान मार्च २०२५ पर्यंत अपेक्षित आहे. मात्र, आर्थिक वर्ष संपायला दोन महिनेच शिल्लक आहेत, तरीदेखील वाढीव टप्पा अनुदानासाठी निधी मिळाला नसल्याने अर्धा लाख शिक्षक पगारवाढीच्या प्रतीक्षेत आहेत. सेवक संच रखडल्याने व सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याने शिक्षण खात्याकडून निधीसाठी प्रस्तावच पाठविण्यात आला नसल्याचे समोर आले आहे.



राज्यातील ७७१ शाळा व ३८३ तुकड्या मागील ११ वर्षांपासून २० टक्के अनुदानावरच आहेत. त्यांना मागच्या वर्षी २० टक्के अनुदान मिळाले, त्यांनतर याच अंशतः व विनाअनुदानित शाळा व तुकड्यांना अद्याप वाढीव टप्पा मिळालेला नाही. त्या शाळा व तुकड्यांना ४३० कोटींचा निधी अपेक्षित आहे. त्यानंतर २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर आलेल्या २२८ शाळा व २६५० तुकड्यांना पुढचा वाढीव टप्पा (दरवर्षी २५० कोटी) यंदा मिळालेला नाही. तसेच यावर्षी राज्यातील दोन हजार नऊ शाळा व चार हजार ११ तुकड्यांचे टप्पा अनुदान ८० टक्के व्हायला हवे होते, पण त्यासाठी ३७६ कोटींचा निधी न मिळाल्याने त्या शाळा व तुकड्या अजूनही ६० टक्क्यांवरच आहेत.

> तत्कालीन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या मार्च २०२३ मधील निर्णयानुसार राज्यातील ३४२७ अंशतः व विनाअनुदानित शाळा व १५ हजार ५७१ तुकड्यांना वाढीव टप्पा अनुदानासाठी ११६० कोटी रुपये देणे अपेक्षित होते. मात्र, चालू २०२४-२५ या आर्थिक वर्षात तब्बल अर्धा लाख शिक्षक वाढीव टप्पा अनुदानासाठी कधी निधी मिळणार, याच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांचे चालू शैक्षणिक वषातील सेवकसंच देखील अजूनपर्यंत झालेला नाही. त्यामुळे त्यांना आता पुढच्याच आर्थिक वर्षात वाढीव टप्प्यासाठी निधी मिळेल, असेही विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात आले.शासनाकडून अनुदान मिळाल्यावर वाढीव अनुदान अंशतः अनुदानित शाळा व तुकड्यांना वाढीव २० टक्के अनुदान सध्या देय आहे. शासनाकडून अनुदान प्राप्त होताच, संबंधित पात्र शाळा व तुकड्यांना वाढीव टप्पा अनुदान वितरीत केले जाईल.
>
> **- डॉ. संपत सूर्यवंशी,** संचालक, माध्यमिक शिक्षण

# गणपती फार्मसीमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** ता. माढा येथील श्री गणपती फार्मसी महाविद्यालयात दि. 27 जानेवारी ते 29 जानेवारी या कालावधि मध्ये क्रीडा सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहामध्ये विविध खेळ आयोजित करण्यात आले होते तसेच महाविद्यालयातील सर्व डी. फार्मसी आणि बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. या क्रीडा सप्ताहात क्रिकेट, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, थ्रो बॉल, कबड्डी, खो- खो,कॅरम, चेस असे वेगवेगळे खेळ घेण्यात आले. तसेच क्रिकेट (मुले) मध्ये चौथ्या वर्ष, क्रिकेट (मुली) मध्ये द्वितीय वर्ष, व्हॉलीबॉल (मुले) मध्ये द्वितीय, थ्रो बॉल (मुली) मध्ये द्वितीय वर्ष, कबड्डी (मुले) मध्ये द्वितीय वर्ष, चेस (मुली) मध्ये साक्षी सिद ,चेस (मुले) अनिकेत गायकवाड कॅरम (मुली) स्नेहा सरवदे आणि सविता पालत्या कॅरम (मुले) प्रशांत नाईकनवरे आणि तेजस हुलगे या संघांनी विजय मिळवला. अशा या ३ दिवसीय क्रीडा सप्ताहात अत्यंत आनंदी व खेळीमेळीचे वातावरण महाविद्यालयात निर्माण झाले असून शैक्षणिक ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना देखील प्राधान्य देणे आज काळाची गरज आहे. अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे यांनी दिली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. आर. डी. बेंदगुडे, अध्यक्ष ॲड.विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबासाहेब येडगे, डॉ.प्रशांत मिसळ प्रा. शिवराज ढगे,प्रा.नामदेव शिंदे व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. हा सप्ताह पार पाडण्यासाठी क्रीडा सहायक म्हणून तृतीय वर्षामधील सुमित बरकडे आणि राजनंदिनी शिंदे या विद्यार्थ्यांनी काम केले. तसेच प्रा.प्रियांक खडसरे व प्रा. शैलेश पेंडोर यांनी समन्वयक म्हणून कार्य केले.

# सोलापुरातून ७६९१ जणांनी दिली परीक्षा

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला एक हजार ९४९ जणांची दांडी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पदासाठी आज पूर्व परीक्षा झाली. सोलापूर शहरातील २७ केंद्रावर सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत एकाच सत्रात परीक्षा झाली. या परीक्षेत ७ हजार ६९१ जणांनी सहभाग घेतला होता. सोलापुरात ही परीक्षा सुरळीत पार पडली आहे.

या परीक्षेसाठी एकूण ९ हजार ६४० उमेदवारांची बैठक व्यवस्था करण्यात आली होती. त्यापैकी आजच्या परीक्षेसाठी ७ हजार ६९१ उमेदवार उपस्थित होते. आजच्या परीक्षेसाठी १ हजार ९४९ जण अनुपस्थित राहिले. सोलापूर जिल्ह्यात ही परीक्षा सुरळीत पार पाडावी. यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने चोख नियोजन करण्यात आले होते.

या परीक्षेसाठी २७ उपकेंद्रप्रमुख, १३४ पर्यवेक्षक, ४५७ समवेक्षक, ५४ लिपिक, २३६ चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली होती. या शिवाय पोलिस आयुक्तालयाकडून १३५ पोलिस अधिकारी/कर्मचाऱ्यांची बंदोबस्तासाठी नेमणूक करण्यात आली होती. आजच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर पोलिस व परिक्षा यंत्रणेच्यावतीने विद्यार्थ्यांची कसून तपासणी करण्यात आली होती.

# पंढरपूर-देहू दरम्यान रेल्वे सुरू करण्याची मागणी

## खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत केली मागणी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्रातील दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे, देहू आणि पंढरपूर रेल्वेमार्गावर रेल्वे सुरू केल्याची मागणी केली. महाराष्ट्रभरातील लाखो वारकरी भक्तांसाठी पंढरपूर देहू रेल्वे सुविधायुक्त ठरेल असे खासदार मोहिते-पाटील यांनी सांगितले.



पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच देहू येथील संत तुकाराम महाराजांचे जन्मस्थान, तसेच आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराजांची समाधी राज्यभरातील लाखो भक्तांचे प्रमुख तीर्थस्थळे आहेत. सध्याच्या परिस्थितीत, देहू आणि पंढरपूर दरम्यान रेल्वे सेवा उपलब्ध नसल्यामुळे भक्तांना आणि सामान्य प्रवाशांना अडचणी येत आहेत. खा.मोहिते-पाटील यांनी रेल्वे मंत्रालयाकडे त्वरित रेल्वे सेवा सुरू करण्याची विनंती खा.मोहिते-पाटील यांनी केली.

याचबरोबर दादर-पंढरपूर सांगोला-मिरजमार्गे सातारा ही एक्सप्रेस आठवड्यातून तीन दिवस चालते प्रवाशांच्या सोईकरता ही रेल्वे दररोज नियमित करण्यात यावी.

कुर्डुवाडी जंक्शनवर पुणे-सिकंदराबाद शताब्दी एक्सप्रेसला थांब्याची मागणी केली आहे.तर हुतात्मा व उद्यान एक्सप्रेसला माढा व जेऊर येथे थांबा देण्याची मागणी केली.

मुंबई-हैदराबाद एक्सप्रेस ही कोरोना काळानंतर संपूर्णपणे एसी कोचमध्ये रूपांतरित करण्यात आली आहे. सध्या या गाडीत २ स्लीपर कोच आणि २ जनरल कोच उपलब्ध आहेत.मुंबई ते हैदराबाद दरम्यानच्या अन्य स्थानकांवरून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांना कोचच्या कमतरतेमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे, या गाडीमध्ये अतिरिक्त २ स्लीपर आणि २ जनरल कोच जोडण्यात यावे म्हणून सांगतिले. खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मतदारसंघातील विविध रेल्वे प्रश्न केंद्रीय रेलवे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमक्ष मांडले यावर मंत्री महोदयांनी संबंधित मागण्या मार्गी लावण्या बाबत सकारात्मक प्रतिसाद दिला.

# शिव विचारांचा प्रचार व प्रसार ही काळाची गरज - प्रा. मिनाक्षी जगदाळे



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघ प्रणित, जिजाऊ ब्रिगेड च्या माध्यमातून, प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके यांच्या मार्गदर्शना प्रमाणे आज पहिल्या रविवारी शिव विचार सर्वांमध्ये रुजवण्यासाठी व जिजाऊंचे विचार घराघरांमध्ये पोहचण्यासाठी शिवविचार बैठक अकलूज ता. माळशिरस, जिल्हा सोलापूर येथे प्रा मीनाक्षी अमोल जगदाळे विभागीय अध्यक्ष- विभाग पुणे यांनी आयोजित केली होती.

जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आज संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम महाराज यांची जयंती

अभंग व वाचनानेसाजरी करण्यात आली. शिवमती प्राध्यापक मीनाक्षी अमोल जगदाळे विभागीय अध्यक्ष यांनी महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी युगपुरुष पुरुषोत्तम खेडेकर साहेब लिखित शिवचरित्राचे वाचन मीनाक्षी जगदाळे यांनी केले. शिवचरित्र, जिजाऊंची शिकवण, शिवबांचा जन्म व शिवबांचे बालपण हे विषय घेऊन सौ जगदाळे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. सर्व महिला बौद्धिक, मानसिक, शैक्षणिक, वैचारिक, साहित्यिक सांस्कृतिक दृष्ट्या सक्षम व्हाव्यात त्यासाठी हा नवीन उपक्रम घेतल्याचे सौ जगदाळे म्हणाल्या.हा विचार महिलांना खूप आवडला.

महिलांनी कार्यक्रमासाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, त्यांना हा उपक्रम खूप आवडला. आणि या गोष्टींची काळाची गरज असल्याचे महिलांनी सांगितले. खूप छान प्रतिक्रिया मिळाल्या.

त्यामुळे प्रत्येक महिन्याच्या रविवारी शिव विचार चे वाचन होईल तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी देखील आपल्याला मार्गदर्शन करतील याचे मी नियोजन करून तुम्हाला वैचारिक मेजवानी दर महिन्याला देणार असल्याचे शिवमती मीनाक्षी जगदाळे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला सर्व क्षेत्रातील व सर्व जाती धर्मातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

# आरक्षण वर्गीकरणासाठीच्या हलगी मोर्चाची नियोजन बैठक संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मातंग, मांग, मोची, मादिगा समाजाचे राष्ट्रीय नेते पद्मश्री मंदा कृष्णा मादिगा यांच्या नेतृत्वाखाली दि.७ फेब्रुवारी २०२५ रोजी अनुसूचित जातीचे अ,ब,क,ड वर्गीकरणासाठी हलगी मोर्चा हैदराबाद येथे आयोजित करण्यात आलेला आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमध्ये उप-वर्गीकरण करण्याची परवानगी राज्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या ऐतिहासिक निकालामुळे मिळाली असतानाही बरीच राज्य सरकारे चालढकल करत आहेत. या पार्श्वभूमीवर झोपलेल्या राज्य सरकारांना जागं करण्यासाठी या हलगी मोर्चाचे आयोजन केले आहे.

या मार्चासाठी आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणातील हलगी वादक लाखोच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रातील मांग, मातंग, मोची, मादिगा समाजातील सुध्दा समाज बांधवांनी मोठया संख्येने हलगी मोर्चात सहभागी व्हावे यासाठी अवाहन करण्याकरीता MRPS नेते मा. सत्यम रागटी मादीगा सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. हा मोर्चा यशस्वी करण्याकरीताची नियोजन बैठक सत्यम रागटी मादीगा यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह, सात रस्ता, सोलापूर येथे संपन्न झाली. या बैठकीस मातंग, आदि जांबमुनी मोची समाजातील प्रमुख पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने नियोजन बैठकीला उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक सकल मातंग समाज राज्य समन्वयक, सुरेश पाटोळे यांनी केले. आदि जांबमुणी मोची समाज अध्यक्ष देवेंद्र भंडारे, माजी राज्यमंत्री उत्तम प्रकाश खंदारे यांनी या बैठकीस मार्गदर्शन केले. MRPS नेते मा. सत्यम रागटी मादीगा यांनी हलगी मोर्चा मागील भूमिका स्पष्ट केली; आणि मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

या नियोजन बैठकीस सुधाकर पाटोळे, गोविंद कांबळे, नरसिंह आसादे, सिद्राम कामाठी नागनाथ कासलुलकर प्रवीण वाडे, रोहित खिलारे, मच्छिंद्र लोकेकर, डॉ, योगेश पल्लेलु, विश्वनाथन पाटोळे, आदी मातंग व मोची समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होत, आभार नरसिंह आसादे यांनी व्यक्त केले.

# त्रिमूर्ती प्रतिष्ठानचे गणेश जयंती निमित्त 171 जणांचे रक्तदान आणि महाप्रसादाचे आयोजन



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गणेश जयंती निमित्त त्रिमूर्ती प्रतिष्ठान आयोजित रक्तदान शिबिर संपन्न झाले. या शिबिरामध्ये १७१ रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान केले. या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे या शिबिरात महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन रक्तदान केले. विशेष बाब म्हणजे सहा दांपत्यांनी जोडीने या शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान केले. यानंतर महाप्रसादाचे देखील आयोजन त्रिमूर्ती प्रतिष्ठान बार्शी च्या वतीने करण्यात आलं होते. या महाप्रसादाचा अनेक भाविक भक्तांनी लाभ घेतला.

दुपारी बारा वाजता श्रीगणेशाची आरती पत्रकार संजय बारबोले तसेच डॉ.सौ शीतल बोपलकर, मनीष चव्हाण पत्रकार धीरज शेळके, वृक्ष संवर्धन चे उमेश काळे, लहू चव्हाण, पत्रकार अक्षय बारंगुळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.य सर्व मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी वर्षभर वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून समाजात एक वेगळं स्थान निर्माण केलेल्या त्रिमूर्ती प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक डॉ. शितल बोपलकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष बबलू साळुंखे तसेच उपाध्यक्ष प्रवीण शिंदे आणि मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# कुमठे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये योग शिबिर आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आर्ट ऑफ लिव्हिंग चे संस्थापक गुरुदेव प.पु.श्री श्री रविशंकर यांच्या वतीने कुमठे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तीन दिवसाचे मेधा शिबिर याचे आयोजन करण्यात आले होते.

कुमठे कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेचे विश्वस्त जयकुमार माने व स्वातीताई माने यांच्या संकल्पनेतून तीन दिवसीय योगा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. योग प्रशिक्षक देव गोसकी व गोरख डांगे यांनी या शिबिराचे मार्गदर्शन केले. या शिबिरात त्यांनी विविध प्रकारची प्राणायाम व योगासने यांचा मानवी शरीरासाठी होणारा फायदा यांचे महत्त्व सांगितले तसेच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, एकाग्रता वाढवणे यासाठी योगाचे अत्यंत महत्त्व आहे तसेच मनातील व शरीरातील सकारात्मक बदल यासाठी योग व प्राणायाम हे अत्यंत महत्त्वाचे आहेत असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे योग व प्राणायाम करून घेतले.

हे योग शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रा.संजय जाधव, प्रा. दादाराव डांगे, प्रा.हनुमंत शिंदे, प्रा. दीपक शिंदे, प्रा. विजयकुमार वाळके, प्रा. विनोद थोरात, प्रा. राजीव निकम व प्रा.बंडोपंत बाबर यांनी परिश्रम घेतले.